# डांगी बोली

डांगी बोलीला डांगी का म्हटले जाते? तर गुजरातमधील डांग हा प्रदेश, तिथे बोलली जाणारी भाषा. 'डांगी' बोली ही मराठीची बोली आहे. डांगी बोली हि अहिराणी बोलीशी साम्य बोली आहे. डांग प्रदेश महाराष्ट्र व गुजरात सीमेवर असल्याने प्रदेश वाचक बोली म्हणून डांग बोली ओळखली जाते.

१९६० मध्ये महाराष्ट्र व गुजरात यांचे द्वैभाषिक राज्य मोडून ती स्वतंत्र राज्ये म्हणून अस्तित्वात आल्यावर डांग हा जंगलाचा प्रदेश गुजरात राज्यात समाविष्ट केला गेला. 'डांग' ची प्रमुख बोली भिल्ली आहे. डांगी हि अहिराणीशी मिळतीजुळती बोली आहे. डांगी मध्ये मराठी प्रमाणेच वर्णाचे दंततालव्य (चमचा, चूक ) व तालव्य (चार, चिवडा) असे दोन उच्चार डांगी मध्ये आहेत. लोखंडे, डोंगरे, बरक, वाटुणा, या शब्दावरून डांगीचे मराठीशी असलेले साम्य लक्षात येते.

डांगी बोली ची लिंग व्यवस्था मराठी सारखीच आहे.

उदा. 'तो' चा नपुसकलिंग मध्ये 'ल' होतो.

वचनविचार अकारान्त, उकारान्त रूप

उदा. फुल डांगीमध्ये फुला असे होते.

नातेवाचक शब्दात 'स' हे प्रत्यय लागते.

उदा. सासू डांगीमध्ये 'सासूस'

नातेवाचक व व्यापारविषयक शब्द वेगळे आढळून येतात.

उदा. फुल (मावशी ) – आखर (गवत)

डांगी भाषिकांची संख्या १९६१ च्या जनगणतेप्रमाणे ६०,५८४ इतकी होती. द्विभाषिक मुंबई राज्याच्या विभाजनाच्या नंतर डांग हा प्रदेश गुजरात राज्यात घालण्यात आला. या प्रदेशाच्या उत्तरेला बडोदे जिल्हा, पश्चिमेला सुरत जिल्हा, दक्षिणेला नाशिक व पूर्वेला खानदेश आहे. डांगच्या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलींना डांगे हे नाव आहे.

खानदेशातून डांग मार्गे गुजरात मध्ये जाताना कोणताही भाषिक बदल एकदम झाल्याचे जाणवत नाही. याचाच अर्थ हा, की डांगी बोली या खानदेशी व गुजरातमधील संक्रमक बोलली आहेत. त्यामुळे गुजराती व मराठी या दोन्ही भाषांची त्यांचे पुष्कळ साम्य आहे. मात्र खान्देशाची असलेले त्यांचे साम्य अत्यंत निकटचे आहे.

डांगीचा अभ्यास द्विभाषिकाच्या विभाजनपूर्व काळात बराच झाला पण त्यामागे ती मराठी किंवा गुजराती ठरवण्याचा आग्रहच प्रामुख्याने होता. ग्रीअससने डांगी बोली व खान्देशी यांना भाषांच्या सत्रात घातले आहे पण हे वर्गीकरण विशेष सहा बोलीचे स्थान व त्यांच्या भाषिकांशी मानक्वशं यांकडे पाहून केलेली दिसते.



कु. रोशन निर्गुण पाटील
F.Y.B.A.